एकात्मिक रोग
सर्वेक्षण प्रकल्प

# Integrated Diseases Surveillance Project (IDSP)

**मुख्य उद्देश** :- साथ उद्रेका आधी धोक्याची सूचना देणारी चिन्हे / लक्षणे ओळखून उपाय योजना करणे हा प्रकल्पाचा उद्देश आहे.

१) आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय , दिल्ली (MOHFW) यांनी हा प्रकल्प संपूर्ण भारतात राज्य व जिल्हा स्तरावर राबविलेला आहे.

२) IDSP ही संपूर्ण भारतात केंद्र शासना मार्फत सुरु झालेली व राज्य शासनामार्फत राबविली जात असलेली योजना आहे.

३) ICT (Information of Communication Technology) मध्ये IDSP आणि ISRO चा संबंध जोडण्यात आलेला आहे. जवळजवळ ४०० साईटस व १४७ वैद्यकीय महाविद्यालये जोडण्यात आलेले आहे. उदा:- महाराष्ट्र , गुजरात , तामिळनाडु, हरियाणा, जम्मु आणि काश्मिर इ. राज्य.

४) अत्यंत अचूक रोग सर्वेक्षणाव्दारे मिळालेल्या माहितीचा उपयोग रोग नियंत्रण कार्यक्रमाच्या संनियंत्रणासाठी करुन आरोग्याची साधने, स्त्रोत जास्त परिणामकारकरित्या वापरता यावीत ही त्या मागची भूमिका.

५) IDSP मध्ये कॉम्प्युटर आणि कम्युनिकेशनची मदत घेतली जाते. या यंत्रणेच्या मदतीने दूरवर्ती शिक्षण, माहिती आणि डाटा यांची देवाण घेवाण सुलभ रीतीने व जलद गतीने होते या मुळे त्वरीत उपाय योजना करता येणे शक्य होते.

६) या प्रकल्पामुळे माहितीचे विश्लेषण होते आणि येणारी नैसर्गिक आपत्ती याची पुर्व तयारी करुन उपाय योजना करता येते. नियमित होणा-या सर्वेक्षणामुळे कार्यक्षमता वाढुन रोग नियंत्रण होते.

७) जिल्हयात कोणत्याही प्रकारचा उद्रेक वा नैसर्गिक आपत्ती आढळून आल्यास कोणीही **१०७५** या क्रमांकावर फोन करुन त्वरीत माहिती दिल्ली पर्यत कळवू शकतो व उपाय योजनांना त्वरीत चालना मिळू शकते. तसेच हा क्रमांक **टोल फ्री क्रमांक आहे.**

## कान्फरेन्स सुविधा :-

१) शेजारी असलेल्या भारतातील सर्व राज्यात ही यंत्रणा जोडलेली असुन जवळच्या राज्यात रोगाचा उद्रेक झाल्यास या सुविधे व्दारे लगेच कळून येते. संबंधित उपाययोजना त्वरीत करता येते. जेणे करुन होणारे मोठे आर्थिक नुकसान / मनुष्य बळ हानी टाळता यावी . उदा :- येणारी पुर परिस्थिती, बर्ड फल्यु , नैसर्गिक आपत्ती इ. सारखे प्रकार त्वरीत कळू शकतील.

२) जिल्हयात कोणत्याही प्रकारचा उद्रेक आढळुन आल्यास दिल्लीला याव्दारे त्वरीत संदेश देता येतो. व संबधित आरोग्य अधिकारी वा तालुका आरोग्य अधिकारी यांचा थेट दिल्लीशी उपाय योजना संदर्भात प्रत्यक्ष संवाद साधला जाऊ शकतो.